# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : डीडीपी. २००९ / प्र. क्र. १४९ / सुधार - १
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १७ ऑगस्ट २०११.

**प्रस्तावना :**

भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजना व्यतिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शक तत्त्व समाविष्ट करण्यात आले आहे त्याप्रमाणे राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहीर करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन होती. सबब, सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेंबर २००८ व दिनांक १६ जून २००९ अन्वये राज्याच्या दारुबंदी धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी सचिव (सा. न्या. वि.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय दारुबंदी धोरण मसुदा समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीत दारुबंदीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे चार विभागाचे प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी तथा गृह विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, विधी व न्याय विभागाचे विभाग प्रमुख सदस्य होते. सदर समितीने अनेक बैठका घेतल्या व सर्वकष विचारांती राज्याचा दारुबंदी धोरणाचा मसुदा शासनास सादर केला होता. सदरच्या महत्त्वाच्या विषयावर मंत्रिमंडळाचे बैठकीत सखोल चर्चा होऊन महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याने सदरचे धोरण फक्त दारुबंदी पुरतेच सिमीत न ठेवता तंबाखू, गुटखा, अफीम व समाजजीवनावर, सामाजिक स्वास्थ्यावर दुष्परिणाम करणाऱ्या इतर सर्व व्यसनांचा समावेश करावा असे ठरले व त्यानुसार योग्य तो बदल करून राज्याचे व्यसनमुक्ती धोरण दिनांक १ जून २०११ रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत संपूर्ण राज्यात लागू करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

**शासन निर्णय :**

वरील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे महाराष्ट्र राज्यात व्यसनमुक्ती धोरणाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देत आहे :-

भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजना व्यतिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शक तत्त्व समाविष्ट केले आहे. भारत हा एक विकसनशील देश असून, मनुष्यबळ ही त्याची संपत्ती आहे. सदर मनुष्यबळातील युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे. तथापि, व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे राज्याच्या आणि राष्ट्राच्या युवा शक्तीचा ऱ्हास होत आहे. व्यसनामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. मुख्यत्वे महिलांना अन्यायाला / अत्याचाराला सामोरे जावे लागते. व्यसनी व्यक्तीच्या मुलांच्या शारीरिक, मानसिक व शैक्षणिक जडणघडणीत त्याचा विपरीत परिणाम होतो. कायदा व सुव्यवस्थेवरही त्याचा गंभीर परिणाम होतो. या सर्वांकरिता वेगवेगळ्या कायदेशीर तरतुदी व परिपत्रके आहेत. परंतु या सर्व व्यसनांचा आलेख वाढतच आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून, व्यसनाचे संपूर्ण निर्मुलन करणे शक्य झाले नाही तरी, अनेक व्यसने तसेच दारू पिण्यास प्राप्त झालेली सामाजिक प्रतिष्ठा नष्ट करणे व सदर व्यसनाला परिणामकारक आळा घालणे हे राज्याचे सामाजिक दायित्व असल्याने

व्यसनमुक्तीचे धोरण जाहीर करण्यात येत आहे.

**पूर्वेतिहास :**

महाराष्ट्र राज्याने सन १९४९ पासून दारुबंदीचा कायदा अमलात आणला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत त्या विभागास प्राप्त होणाऱ्या महसुलातून स्वतंत्र संचालनालयामार्फत दारुबंदी प्रचार व प्रसार योजना राबविण्यात येत होती. सन १९९० मध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभाजन करून व्यसनमुक्ती व दारुबंदी प्रचार योजना सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग करण्यात आली. तथापि, संचालक पदाव्यतिरिक्त इतर २८३ पदे समाज कल्याण विभागाकडे वर्ग केल्यानंतर सदर पदांना अतिरिक्त घोषित करून सहा पदाव्यतिरिक्त इतर सर्व पदे इतरत्र समायोजित करण्यात आली.

**सद्य:स्थिती :-**

राज्यात व्यसनमुक्तीसाठी ५२ दारुबंदी संस्कार केंद्रे स्थापन करण्यात आली असून सदर केंद्रांवर अंशकालीन संघटक व पहारेकरी - खेळगडी असे दोन कर्मचारी अत्यल्प (रुपये २३० व रुपये १४० प्रति महा अनुक्रमे) मानधनावर कार्यरत आहेत. सन २००१ मध्ये व्यसनमुक्ती प्रचार योजना जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागात विलीन करण्यात आली. केवळ व्यसनमुक्तीचे कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सन १९९८-१९९९ पासून पुरस्कार देण्याची योजना व दारुबंदी प्रचार कार्यासाठी जिल्हा परिषदांना वित्तीय अनुदान दिले जाते. सन २००९-२०१० या वित्तीय वर्षात प्रचारासाठी रुपये ४५.८६ लाख व सन २०१०-२०११ मध्ये रुपये ४५.०९ लाख फक्त अनुदान उपलब्ध आहे. सद्य:स्थितीत व्यसनमुक्ती व दारुबंदी योजना, यंत्रणे अभावी प्रभावहीन झाली आहे.

मंत्रिमंडळाने दिनांक १ जून २०११ च्या बैठकीत खालीलप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती संबंधीचे धोरण सहमत केले आहे.

**धोरण विधान :-**

जनता व्यसनमुक्तीची मागणी करेल तेथे शासन व्यसनांच्या बंदीच्या बाजूने जनतेच्या मागे उभे राहील. व्यसनांचा प्रसार नव्हे, तर बेकायदा व्यसनांचे संपूर्ण निर्मुलन व वैध व्यसनांचे प्रभावी नियंत्रण हे राज्याचे व्यसनमुक्ती धोरण आहे. समाज प्रबोधनातून व मतपरिवर्तनातून व्यसनमुक्ती केली जाईल.

**उत्पादन विषयक धोरण :-**

अवैध व्यसनांचे उत्पादन व विक्रीला पूर्णपणे आळा घालणे. यासाठी संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे संबंधित अधिकारी, अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी व इतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल.

**मद्यसेवन परवाना मद्यविक्रीबाबत धोरण :-**

(१) मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ७० (ड) १ (१) मध्ये शासन अधिसूचना दिनांक १३ नोव्हेंबर २००९ प्रमाणे दारू पिण्याच्या परवान्यावर एका व्यक्तीस आठवड्यातून दोन पेक्षा जास्त बाटल्यांची (प्रत्येकी ७५० मि. लि.) विक्री केली जाणार नाही.

(२) शासनाने मद्य सेवन परवान्यांवर दारू बाळगण्याची व विकत घेण्याची जी मर्यादा घालून दिलेली आहे त्या मर्यादेचा भंग झाल्यास नियमातील तरतुदीनुसार संबंधित कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

(३) दारू पिण्याचा परवाना मिळविण्यासाठी मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम, ७० (डी) नुसार सौम्य बियरसाठी २१ वर्ष व इतर देशी विदेशी मद्य यासाठी किमान २५ वर्षाची

वयोमर्यादा (वर्धा जिल्हा वगळता) राहील. वर्धा जिल्ह्यासाठी किमान ३० वर्ष वयाची मर्यादा राहील.

(४) दारूमुक्त क्षेत्रात मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ७० (डी) खाली केलेल्या तरतुदीनुसार केवळ वैद्यकीय कारणास्तव, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र असल्याशिवाय मद्य सेवन करण्याचा परवाना दिला जाणार नाही.

**दारुसेवन विषयक धोरण :-**

(१) दारु पिऊन सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्यांवर मुंबई मद्य निषेध कायदा, १९४९ च्या कलम ८५ (१) (ए) (बी) व (२) तसेच अस्तित्वात असलेल्या इतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(२) सार्वजनिक समारंभात मद्य प्राशन करण्यास परवानगी घेणे सक्तीचे आहे. तथापि, मद्य प्राशन करून गोंधळ घातल्यास संबंधितांचे परवाने निलंबित / रद्द करून त्यांचेविरुद्ध कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे.

(३) मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांचा मद्य परवाना जप्त करून दंडात्मक कार्यवाही करणे व असा गुन्हा पुन्हा घडल्यास, वाहन चालविण्याचा परवाना रद्द करण्यात येईल.

**वैध मद्य विक्री परवानाविषयक धोरण :-**

(१) शैक्षणिक व सामाजिक संस्था, शासकीय कार्यालय, उद्याने, दवाखाने, ग्रंथालय, धार्मिक स्थळे, राष्ट्रीय व राज्य महामार्ग यांच्यापासून आंतरनिर्बंध परवाना कक्षासाठी ७५ मीटर व देशी दारुसाठीचा महानगरपालिका क्षेत्रासाठी ५० मीटर व इतर ठिकाणी १०० मीटरच्या आत दारू दुकानांना परवाना देण्यात येणार नाही.

(२) दारू विक्रीची कोणतीही अनुज्ञप्ती स्थलांतरीत करताना / देताना, ग्राम सभेचा ठराव घेऊन, ना-हरकत परवाना घेणे, त्याचप्रमाणे नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका या क्षेत्रातील त्या प्रभागसभेचे ना-हरकत परवाने घेणे. सदर ठराव त्या ग्राम पंचायत क्षेत्र / महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या त्या प्रभागातील एकूण मतदारांच्या ५० टक्के अथवा महिला मतदारांच्या ५० टक्के इतक्या बहुसंख्येने सहमत असावा.

(३) पूर्वी अस्तित्वात असलेल्या परवान्यांचे दिनांक ३१ मार्च नंतर नुतनीकरण करताना कोणत्याही संस्थेने, ग्रामसभेने, प्रभाग सभेने किंवा नगरपालिका यांनी तक्रार केल्यास जिल्हाधिकारी यांना उक्त परवान्याचे नुतनीकरण न करण्याचे पूर्ण अधिकारी असतील.

(४) लष्करातील आजी-माजी व्यक्तींना मिळणाऱ्या कोट्यातील दारुची विक्री त्यांनी केल्यास त्यांच्या विरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**वैध दारुबाबत जनतेचे अधिकार :-**

(१) ग्राम पंचायत क्षेत्र / महानगरपालिका / नगरपंचायती / नगरपरिषदेच्या त्या प्रभागातील एकूण २५ टक्के मतदार किंवा महिला मतदारांच्या २५ टक्के महिला मतदार यांना त्यांच्या हद्दीतील दारु दुकान बंद करण्यासाठी संबंधित तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी मागणी करता येईल.

(२) गुप्त मतदानाच्यावेळी व ग्राम सभा ठरावाच्यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाची शासन अधिसूचना दिनांक २५ मार्च २००८ व दिनांक २२ फेब्रुवारी २००९ नुसार संबंधित अनुज्ञप्तीधारक अथवा त्याचे प्रतिनिधी मतदान केंद्रात उपस्थित राहू शकतील.

(३) गुप्त मतदानाच्यावेळी त्या क्षेत्रातील राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय दारुबंदी

समितीचे दोन सदस्य निरीक्षक म्हणून मतदान केंद्रात उपस्थित राहू शकतील.

(४) ग्राम पंचायत दारुबंदी समिती किंवा ग्राम रक्षक दल, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेतील व्यसनमुक्तीचे कार्य करणारे व बचत गटातील महिला सदस्या यांनी अवैध दारुची माहिती राज्य उत्पादन शुल्क किंवा पोलीस विभागाला दिल्यास सदर विभाग त्याची तात्काळ दखल घेऊन गैरप्रकाराबाबत कायदेशीर कार्यवाही करेल.

**प्रशासकीय जबाबदाऱ्या :-**

(१) वैध दारुचे दुकान बंद करण्याबाबत मागणी पत्रक मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत गुप्त मतदान घेण्याची व तीन महिन्यात ग्राम सभेच्या / नगरपंचायती / नगरपरिषद / महानगरपालिका वॉर्डच्या ठरावानुसार अनुज्ञप्ती बंद करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी पूर्ण करतील.

(२) सदर गुप्त मतदानाची वेळ वाढवून त्याच दिवशी सायंकाळी ४-०० वाजता मत मोजणी करून निकाल जाहीर करणे.

(३) ग्राम पंचायत क्षेत्रातील मतदान व मत मोजणी प्रक्रिया नायब तहसीलदार यांच्यापेक्षा कमी दर्जा नसेल अशा अधिकाऱ्याने पूर्ण करणे.

(४) नगरपरिषदा / नगरपंचायती / महानगरपालिका यांच्या वॉर्डातील मतदान व मतमोजणी प्रक्रिया मुख्य अधिकारी / उप आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले उप मुख्याधिकारी / सहायक आयुक्त यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पूर्ण करणे.

(५) एकदा ग्राम सभेच्या ठरावानुसार / मतदानाने गावात दारुबंदीचा ठराव झाल्यास त्या गावातील सर्व दारू विक्री परवाने बंद करता येतील का हे तपासून धोरणात्मक निर्णय घेतला जाईल.

(६) संबंधित क्षेत्रातील दारुबंदी समितीच्या दोन अशासकीय सदस्यांसमोर अवैध दारू नष्ट करण्यात येईल व पंचनाम्यावर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जातील.

(७) अवैध दारू उत्पादन, विक्री, साठा अथवा वाहतूक करणाऱ्याविरुद्ध मुंबई मद्य निषेध अधिनियम, १९४९ नुसार सदर गुन्हे सिद्धापराध ठरविल्यास, आयुक्त / जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय जिल्हा दंडाधिकारी त्या व्यक्तीवर जिल्हा हद्दपारीची कार्यवाही करतील.

(८) व्यसनमुक्ती समितीचे सदस्य / ग्रामस्थ / ग्राम रक्षक दल यांना दारुबंदीबाबत सहकार्य न करणाऱ्या संबंधित पोलिसांवर नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

(९) राज्यात एकूण नऊ "ड्राय डे" रहातील त्या व्यतिरिक्त स्थानिक पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांना (तीन) ३ अतिरिक्त "ड्राय डे" घोषित करता येतील.

**ग्रामसभेची कर्तव्य :-**

(१) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमे अंतर्गत दिनांक १४ ऑगस्ट २००८ च्या शासन निर्णयानुसार ग्रामसभेने ग्राम रक्षक दलाची स्थापना करणे.

(२) मुंबई ग्राम पंचायत अधिनियमातील कलम ५४ नुसार केलेल्या परिशिष्ट १ मधील सूची १५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीने दारुबंदीसह व्यसनमुक्ती प्रचाराचे काम करण्यासाठी दारुबंदीसह व्यसनमुक्ती समिती स्थापन करणे.

**दारुबंदीसह व्यसनमुक्ती समित्यांची रचना व कर्तव्य :-**

(१) राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय व्यसनमुक्ती समितीचा कार्यकाळ ५ वर्षांचा असेल.

(२) तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय दारुबंदीसह व्यसनमुक्ती समितींच्या दर दोन महिन्यांनी बैठका

आयोजित करणे त्यात संबंधित पोलीस ठाणे प्रमुख यांनी दारुबंदीसह व्यसनमुक्ती विषयक वस्तुस्थिती व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे.

(३) जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय व्यसनमुक्ती समितीत एकूण सदस्यांपैकी ३० टक्के सदस्य या महिला असतील.

(४) राज्यस्तरीय नियामक मंडळाने नेमून दिलेले दारुबंदीसह व्यसनमुक्तीचे कार्यक्रम व धोरणाची अंमलबजावणी करणे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाला सादर करणे.

**राज्यस्तरीय दारुबंदी व व्यसनमुक्ती मंडळाची रचना व कर्तव्ये :-**

(१) राज्यस्तरीय नियामक मंडळ मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असेल व त्यात मा. उप मुख्यमंत्री, मंत्री, सामाजिक न्याय (व्यसनमुक्ती कार्य) मंत्री, राज्य उत्पादन शुल्क या विभागाचे दोन राज्यमंत्री व व्यसनमुक्ती विषयाशी निगडीत सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या दोन प्रतिष्ठीत व्यक्ती यांचा समावेश असेल.

(२) सदर नियामक मंडळात स्वातंत्र्य सैनिक, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे सदस्य, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य व नशाबंदी मंडळाचे महिला प्रतिनिधी, अनुसूचित जाती - जमातीचे महिला प्रतिनिधी यांचा सदस्य म्हणून समावेश असेल तसेच आरोग्य विभाग, वित्त विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, सामाजिक न्याय विभाग, गृह विभाग या विभागांचे विभाग प्रमुख सदर समितीचे पदसिद्ध सदस्य असतील.

(३) नियामक मंडळ राज्याचे व्यसनमुक्ती धोरण राबविण्यासंदर्भात योजना व खर्च यावर नियंत्रण ठेवेल व आवश्यकतेनुसार धोरणात बदल करेल.

**प्रचार व प्रसार :-**

(१) सर्व शैक्षणिक संस्था, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात दारुसह सर्व व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती समाविष्ट करतील.

(२) व्यसनांचे दुष्परिणाम, त्याचे महिला विरोधी व गरीबी विरोधी स्वरूप समाजासमोर आणण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये पथनाट्य, एकांकिका, पोस्टर्स, स्लोगन्स व इतर स्पर्धांचे आयोजन करणे.

(३) मद्यपानासह सर्व व्यसनांच्या दुष्परिणामांची चित्रफीत / चलचित्र तयार करून शाळा, महाविद्यालये, यात्रा, गणेशोत्सव, महिला मंडळे अशा सार्वजनिक उत्सवांच्या ठिकाणी दाखविणे.

(४) अंमली पदार्थ विरोधी दिन, तंबाखू विरोधी दिन, धुम्रपान विरोधी दिन, नशाबंदी दिवस तसेच सप्ताह पाळण्यात यावेत व अशा दिवशी शैक्षणिक संस्थांमधून प्रचार फेरी काढणे.

(५) व्यसनांचे दुष्परिणाम दर्शविणाऱ्या दूरदर्शन मालिका, लघूपट, हिंदी - मराठी भाषेत जाहिराती, दूरवाणी तथा दूरदर्शन माध्यमामार्फत प्रसारित करणे.

(६) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दवाखान्यात नेऊन व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती देणे.

(७) व्यसनमुक्ती गाव अभियान राबवून दूरवाणी व दूरदर्शनवर त्याची व्यापक प्रसिद्धी करणे. व्यसनमुक्त गावास देण्यात येणाऱ्या पुरस्काराची रक्कम बचत प्रमाणपत्र स्वरूपात तीन वर्षांच्या ठेवीसाठी देणे, जेणेकरून ते गाव किमान तीन वर्षे तरी व्यसनमुक्त राहील.

(८) किर्तने तथा लोककला माध्यमातून दारुबंदी व व्यसनमुक्तीचा प्रचार करणे.

**व्यसनमुक्तीसाठी प्रशिक्षण :-**

(१) समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती प्रचारकार्य या विषयाचा कार्यानुभव

अनिवार्य करून त्यांना प्रचार कार्यात सहभाग करणे. तसेच ऑक्झीलरी नर्स, मिडवाईफ व बहुउद्देशीय आरोग्य सेवक यांच्या अभ्यासक्रमात देखील व्यसनमुक्तीचे प्रशिक्षण देणे.

(२) अल्कोहोलीक ॲनॉनिमसच्या व असे कार्य करणाऱ्या इतर कार्यकर्त्यांचा व्यसनमुक्ती व दारुबंदी प्रचारात सहभाग करणे.

व्यसनमुक्तीसाठी उपचार :-

(१) व्यसनाधीन शासकीय कर्मचाऱ्यांना व्यसनमुक्तीसाठी कौन्सिलिंगची सुविधा.

(२) राज्यस्तरीय व्यसनमुक्ती नियामक मंडळाच्यावतीने जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्या, ग्राम रक्षक दल, ग्रामपंचायत व्यसनमुक्तीकार्य समित्यांचे सदस्य, कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना व व्यसनमुक्तीचे कार्य करणाऱ्या इच्छुक लोकांना व्याख्याने, पथनाट्य, पोस्टर्स, चित्रफित व इतर माध्यमांतून प्रशिक्षण देणे.

(३) मानसोपचार तज्ज्ञ व समाजकार्यात प्रशिक्षित असलेल्यांना दारुबंदी व व्यसनमुक्तीसाठी सल्लागार म्हणून नेमणे.

(४) प्रत्येक जिल्हा रुग्णालयातील १० खाटांच्या मनोविकार कक्षात व्यसनमुक्तीसाठी रुग्णांना भरती करण्यात येईल व व्यसनाधीन व्यक्तीवर उपचाराची सोय तसेच त्याला सल्ला (Counselling) देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या जातील.

(५) वैद्यकीय उपचार केंद्राने व्यसनमुक्तीसाठी दीर्घकाळ व अल्पकालीन योजना आखावी व त्याप्रमाणे व्यसनमुक्त होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला दवाखान्यात दाखल करून उपचार करणे.

(६) महाराष्ट्रातील चारही प्रादेशिक मनोरुग्णालयात व्यसनमुक्तीचे उपचार केले जातील.

(३) या धोरणात -ज्या-ज्या विभागांना आपली कर्तव्य पार पाडावयाची आहेत ते विभाग सध्या अस्तित्वात असलेल्या कर्मचारी वृंदामार्फत राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी करतील.

(४) सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निर्गमित करण्यात येत आहे.

(५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध केला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०११०८१७१५३५४१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दिनेश वाघमारे )
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. उप मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. मंत्री (सा. न्या.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. मंत्री, गृह विभाग / राज्य उत्पादन शुल्क यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. मंत्री, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री (सा. न्या.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री, गृह विभाग / राज्य उत्पादन शुल्क स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

मा. राज्यमंत्री, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव (नियोजन विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव (वित्त विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, गृह विभाग / राज्य उत्पादन शुल्क यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त, मुंबई,
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,

निवड नस्ती का. सुधार-१.

-------------